आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

७ जुलै २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- नीट युजी संदर्भात फेरपरीक्षेच्या मागणीसह संबंधित २६ याचिकांवर उद्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- ओदिशात जगन्नाथ रथयात्रेला सुरूवात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही उपस्थिती

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर

- जम्मू काश्मीरच्या कुलगाम इथं सुरक्षा दलं आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत अकोल्याच्या जवानासह दोन जवानांना वीरमरण / सहा दहशतवादीही ठार

- ऊर्जा विभागाच्या तीनही कंपन्यांच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचं मूळ वेतन आणि भत्त्यात वाढ

**आणि**

- झिम्बाव्वे विरोधातल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा १०० धावांनी विजय

**<><><><><>**

नीट युजी ची फेरपरीक्षा घेण्यात यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह संबंधित अन्य २६ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात उद्या सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड आणि इतर दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे.

नीट युजी परीक्षेदरम्यान झालेल्या गैरप्रकारांमुळे ही परीक्षा पुन्हा घेण्यात यावी अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी याचिकेत केली आहे. मात्र या परीक्षेत मोठ्या

प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे कोणतेही पुरावे नसल्यानं परीक्षा पुन्हा घेण्याची आवश्यकता नाही, असं केंद्र सरकारनं सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

ओडिशात,भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र, देवी सुभद्रा आणि भगवान सुदर्शन यांच्या जगप्रसिद्ध रथयात्रेला आज संध्याकाळी पुरी शहरात सुरुवात झाली. भगवान जगन्नाथ रथ ज्या रस्त्यावरून ओढला जाणार आहे तिथं भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या वार्षिक उत्सवात सामील सहभागी झाल्या आहेत. या रथयात्रेसाठी जगभरातले भाविक आले आहेत.

त्याआधी पहंडी विधी झाल्यानंतर पुरी पिठाचे शंकराचार्य निश्चलानंद सरस्वती यांनी भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र, देवी सुभद्रा या तिन्ही भावंड देवतांचं पूजन केलं. या उत्सवासाठी राज्य सरकारने चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी सर्व देशवासियांना जगन्नाथ यात्रेनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

नाशिकच्या पंचवटीतही आज भगवान श्री जगन्नाथ  रथ यात्रा काढण्यात आली. त्यावेळी पुरुष भाविकांसह शेकडो महिला भाविकांनीही रथ ओढला. यात्रेतून धर्माचं तसंच पर्यावरणाचं रक्षण करण्यासाठी जलरक्षा नदी सुरक्षा पर्यावरण बचाव, वृक्ष वाटप करत पर्यावरण बचाव अशा विविध विषयांवर जनजागृती करण्यात आली.

<><><><><>

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली अर्थसंकल्पपूर्व विचारविनिमय  नुकताच पूर्ण झाला.  या बैठकांच्या सत्रात  संबंधित १० गटांमधले १२० हून अधिक निमंत्रित, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी अर्थशास्त्रज्ञ सहभागी झाले होते. तसंच

कामगार संघटना, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र, रोजगार आणि कौशल्य, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग; व्यापार आणि सेवा, उद्योग, अर्थतज्ञ, वित्तीय क्षेत्र आणि भांडवली बाजारासह पायाभूत सुविधा क्षेत्र, ऊर्जा आणि शहरी क्षेत्रांच्या प्रतिनिधींनी या बैठकांमध्ये आपले विचार आणि अपेक्षा मांडल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून रशिया आणि ऑस्ट्रियाच्या तीन दिवसीय अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी २२ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियन फेडरेशनचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निमंत्रणावरून मॉस्कोमध्ये उपस्थित असतील. दोन्ही देशांमधल्या संपूर्ण बहुआयामी संबंधांचा आढावा दोन्ही नेते घेतील.

रशियाचा दौरा आटोपल्यानंतर प्रधानमंत्री मंगळवारी ऑस्ट्रियाला पोहोचतील. ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहॅमर यांनी मोदी यांची व्हिएन्ना भेट हा विशेष सन्मान असल्याचं सांगत आपण या भेटीची आतुरतेनं वाट पाहत असल्याचं म्हटलं आहे. गेल्या ४१ वर्षांतली भारतीय प्रधानमंत्र्यांची ही पहिलीच ऑस्ट्रिया भेट असेल. व्हिएन्ना इथं मुक्कामा दरम्यान, मोदी ऑस्ट्रियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतील आणि चांसलर नेहॅमर यांच्याशी चर्चा करतील.

**<><><><><>**

आपल्या प्रदेशाची गरज लक्षात घेऊन भविष्यात कोणतं तंत्रज्ञान आपल्यासाठी उपयुक्त आहे, याचा विचार करा आणि त्यानुसार तरुणांमध्ये नवतंत्रज्ञानाचे कौशल्य विकसित करा, असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी औद्योगिक कंपन्यांना केलं आहे.

विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रीज असोसिएशन, महिंद्रा ट्रॅक्टर्स, यंत्र इंडिया लिमिटेड यांनी संयुक्तपणं स्थापन केलेल्या वेदिक-महिंद्रा कौशल्य विकास केंद्राचं

उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते. देशाला पेट्रोल-डिझेलमुक्त  करण्याचं आपलं ध्येय असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांच्याविरोधात समाजमाध्यमावर आक्षेपार्ह टिपणी प्रकरणी दिल्ली पोलिसांनी तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. रेखा शर्मा यांनी केलेल्या तक्रारीनंतर मोईत्रा यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या ७९ कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला.

दरम्यान, मोईत्रा यांच्या आक्षेपार्ह विधानाची  राष्ट्रीय महिला आयोगानं गंभीर दखल घेतली आहे. मोईत्रा यांचं विधान महिलांचा अधिकार आणि प्रतिष्ठेचं उल्लंघन करणारं असल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

<><><><><>

बहुजन समाज पार्टीचे तमिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष के. आर्मस्ट्राँग यांच्या हत्येची सीबीआय चौकशी करण्याची मागणी पक्षाच्या प्रमुख मायावती यांनी केली आहे. चेन्नई इथं आर्मस्ट्राँग यांच्या पार्थिवाला पुष्पांजली वाहिल्यानंतर त्या बातमीदारांशी बोलत होत्या. राज्यातल्या दुर्बल घटकांचं रक्षण करण्याचं आणि कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचं आवाहन त्यांनी राज्य सरकारला केलं. दरम्यान, आर्मस्ट्राँग यांचं दफन पक्ष कार्यालयात करण्याची मागणी न्यायलयानं अमान्य करत राज्य सरकारने देऊ केलेल्या जागेत दफनविधी करावा असं सुचवलं.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात काल सुरक्षादल आणि दहशतवादी यांच्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चकमकीत सहा  दहशतवादी ठार झाले तर दोन जवानांना वीरमरण आलं. या दोघांपैकी एक जवान महाराष्ट्रातल्या अकोला जिल्ह्यातला आहे. कुलगाम मध्ये चिन्नीगाम आणि मोडेरगाम इथं दहशतवादी लपून

बसल्याची खबर कळताच सुरक्षा दलांनी तातडीनं कारवाई केली. मोडरगम इथल्या चकमकीत अकोला जिल्ह्यातल्या मोरगाव भाकरे इथल्या प्रवीण प्रभाकर जंजाळ या जवानाला हौतात्म्य आलं. प्रवीण जंजाळ यांचे पार्थिव विमानानं नागपूरला आणण्यात येणार असून त्यानंतर ते त्यांच्या मूळगावी नेलं जाणार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या लष्करी इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

दरम्यान, राजौरी जिल्ह्यातल्या सीमाभागात आज पहाटे दहशतवाद्यांनी सुरक्षा चौकीवर केलेल्या गोळीबार केला. यात सुरक्षा दलाचा एक जवान जखमी झाला.

**<><><><>**

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखाली वीज कंपन्यांतल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मूळ वेतनात १९ टक्के आणि सर्व भत्त्यांमध्ये २५ टक्के वाढ देण्यात येत असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.सह्याद्री अतिथी गृहात ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालच्या वीज कंपन्यांतल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतन पुनर्निर्धारण करण्याबाबत बैठकीत ते आज बोलत होते. या वीज कंपन्यात महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा समावेश आहे. सहाय्यकांना परिविक्षाधीन कालावधीकरता पाच हजार रुपयांची वाढ आणि तांत्रिक कर्मचारी यांना मिळणारा रू.500/- चा भत्ता दुप्पट करण्यात आला आहे, असं फडणवीस यांनी सांगितलं. या बैठकीत तिन्ही कंपन्यांचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

मुंबईतल्या वरळी इथल्या हिट अँड रन प्रकरणातील कुणालाही पाठिशी घातलं जाणार नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते आज नागपूर

इथं बातमीदारांशी बोलत होते. कायदा सर्वांसाठी समान असून दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल असं ते म्हणाले.

वरळीत आज पहाटे साडे पाचच्या सुमारास दुचाकीवरून जाणाऱ्या एका दांपत्याला गाडीनं दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाला. ज्या गाडीनं धडक दिली ती शिवसेनेचे पालघरचे उपनेते राजेश शहा यांच्या मालकीची आहे. अपघात झाला तेव्हा गाडीत त्यांचा मुलगा मिहिर शहा आणि चालक दोघेही होते. अपघातानंतर हे दोघं पळून गेले असून पोलिसांनी या दोघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

भारत आणि झिम्बाव्वे यांच्यात आज झालेल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारतानं १०० धावांनी विजय मिळवत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, अभिषेक शर्मा यानं झळकावलेल्या पहिल्या शतकाच्या जोरावर भारतानं, झिम्बाव्वे समोर विजयासाठी २३५ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र १९व्या षटकातच झिम्बाव्वेचा संपूर्ण संघ १३४ धावांत माघारी परतला. भारताच्या वतीनं मुकेश कुमार आणि आवेश खान यांनी प्रत्येकी ३ तर रवी बिष्णोई यानं २ गडी बाद केले.

**//<><><><><>//**